माउस सूप

अर्नोल्ड लोबेल

अनुवादः मुक्ता वाटवे



माउस सूप

अर्नोल्ड लोबेल

अनुवाद: मुक्ता वाटवे





सूपसाठी कहाण्या



एक उंदीर एका झाडाखाली बसून
पुस्तक वाचत होता.



अचानक एका वीझलने* झडप
घालून त्या उंदराला पकडलं.

*एक छोटा, गुबगुबीत पण हिंस्र प्राणी.

वीझल उंदराला घेऊन आपल्या घरी गेला.

"वाह्!" वीझल म्हणाला.

“मी आता मस्त माऊस-सूप बनवणार.”

"अच्छा!" उंदीर म्हणाला.

"म्हणजे माझं आता माऊस-सूप बनणार तर."





“माझ्याकडे तर कहाण्याच नाही आहेत पण,” वीझल म्हणाला.

“माझ्याकडे आहेत की," उंदीर म्हणाला.

“मी तुला त्या आत्ता सांगू शकतो."

"ठीक आहे,” वीझल म्हणाला.

"पण लवकर. मला खूप भूक लागली आहे."

"ह्या आहेत सूपमध्ये घालण्यासाठी चार कहाण्या," उंदीर म्हणाला.

वीझलने उंदराला एका पातेल्यात ठेवलं.

"थांब थांब!” उंदीर म्हणाला.

"हे सूप अगदी कसंतरीच लागेल. त्यात कहाण्याच घातल्या नाही आहेत.

माऊस-सूपमध्ये कहाण्या घातल्या की ते कसं चवदार होतं!"





गांधीलमाश्या आणि चिखल

एक उंदीर जंगलातून चालला होता.

गांधीलमाश्यांचं एक घरटं झाडावरुन सुटलं

आणि बरोब्बर उंदराच्या डोक्यावर येऊन पडलं.

"अगं माश्यांनो," उंदीर म्हणाला, "तुम्ही इथून उडून जा बघू.

मला काही माझ्या डोक्यावर गांधीलमाश्यांचं घरटं नको आहे."





पण गांधीलमाश्या म्हणाल्या,

"आम्हाला तुझे कान आवडले,

आम्हाला तुझं नाक आवडलं,

आम्हाला तुझ्या मिश्या आवडल्या.

आमच्या घरट्याला हीच जागा
एकदम मस्त आहे.

आम्ही मुळीच इथून उडणार नाही."



उंदराला हे अजिबात आवडलं नाही.

पण काय करावं त्याला कळेना.

गांधीलमाश्या फारच जोरजोरात घोंघावत
होत्या.

उंदीर आपला चालत राहिला.

त्याला दिसली एक चिखलट दलदलीची जागा.

"अगं माश्यांनो," उंदीर म्हणाला,

"माझंही तुमच्यासारखं एक घरटं आहे.

माझं घर आहे ते.

तुम्हाला जर माझ्या डोक्यावर राहायचं असेल

तर तुम्हाला माझ्या घरी यावं लागेल."

"नक्कीच," गांधीलमाश्या म्हणाल्या.

"आम्हाला तुझे कान आवडले.

आम्हाला तुझं नाक आवडलं,

आम्हाला तुझ्या मिश्या आवडल्या.

आम्ही आनंदाने तुझ्या घरी येऊ."



"ठीक आहे मग," उंदीर म्हणाला

आणि गुडघाभर चिखलात शिरला.

"हे आहे माझं दार," उंदीर म्हणाला.

"हो हो," गांधीलमाश्या म्हणाल्या.



उंदीर कंबरभर चिखलात शिरला.

"ही माझी बैठकीची खोली," उंदीर म्हणाला.

"हो हो," गांधीलमाश्या म्हणाल्या.



उंदीर हनुवटीपर्यंत चिखलात शिरला.

"ही माझी झोपायची खोली," उंदीर म्हणाला.

"हो हो," गांधीलमाश्या म्हणाल्या.



"आणि आता मी झोपणार आहे," उंदीर म्हणाला.


त्याने डोकं चिखलात बुडवलं.

"नाही नाही!" गांधीलमाश्या म्हणाल्या.

"आम्हाला तुझं दार आवडलं.

आम्हाला तुझी बैठकीची खोली आवडली.

आम्हाला तुझी झोपायची खोली आवडली.



पण नाही, नाही, नाही,

आम्हाला तुझा पलंग मुळीच नाही आवडला!"

गांधीलमाश्या हवेत उडाल्या आणि पसार झाल्या.

उंदीर आंघोळ करायला आपल्या घरी गेला.




दोन मोठे दगड

टेकडीच्या एका बाजूला दोन मोठे दगड बसले होते.

आजूबाजूला गवत उगवलं होतं. फुलं उमलली होती.

"टेकडीची ही बाजू किती सुंदर आहे नं," पहिलं दगड म्हणाला.

"पण दुसऱ्या बाजूला काय असेल बरं?"



"आपल्याला नाही माहीत. आणि आपल्याला कधी ते कळणार सुद्धा नाही," दुसरा दगड म्हणाला.



पक्षी आकाशात झेपावला.

टेकडीच्या माथ्यावरून उंच उंच उडाला.

मग परत येऊन म्हणाला,

"मला दिसली शहरं आणि दिसले राजवाडे.

मला दिसले डोंगर आणि दिसल्या दऱ्या.

खूपच सुंदर दृश्य आहे."

एक दिवस एक पक्षी येऊन टेकडीवर बसला.

"पक्ष्या पक्ष्या, टेकडीच्या पलीकडच्या बाजूला काय आहे आम्हाला सांगशील का?" दगड म्हणाले.



पहिला दगड म्हणाला, "या सगळ्या गोष्टी तर टेकडीच्या दुसऱ्या बाजूला आहेत."

"किती वाईट," दुसरा दगड म्हणाला.

"आपण नाही पाहू शकत. आपण कधीच नाही पाहू शकत."

ते दोन दगड तसेच बसून राहिले.

त्यांना शंभर वर्षं वाईट वाटत राहिलं.





एक दिवस तिथे एक उंदीर आला.

"उंदरा उंदरा, टेकडीच्या पलीकडच्या बाजूला काय आहे आम्हाला सांगशील का?” दगड म्हणाले.

उंदीर तुरूतुरू टेकडी चढला.

आपलं नाक जमिनीला लावून त्याने पलीकडे पहिलं.

परत येऊन तो म्हणाला, “मला दिसली जमीन आणि दिसले दगड.

मला दिसलं गवत आणि दिसली फुलं.

खूपच सुंदर दृश्य आहे."




"पक्ष्याने आपल्याला खोटंच सांगितलं.

टेकडीची पलिकडची बाजू तर आपल्या बाजूसारखीच आहे."

"किती छान!" दुसरा दगड म्हणाला.

“आता आम्ही आनंदात आहोत.

आम्ही नेहमीच आनंदात असू."





रातकिडे


एका रात्री एका उंदराला जाग आली.

खिडकीबाहेरून किर्र किर्र आवाज येत होता.

"काय आवाज आहे हा?" उंदराने विचारलं.

"काय म्हणालास?" रातकिड्याने विचारलं.

"मला माझ्या संगीतातून तुझं बोलणं ऐकू येत नाही आहे."



"झोपायचं आहे मला," उंदीर म्हणाला.

"नको आहे मला अजून संगीत."




लवकरच तिथे दोन रातकिडे किर्र किर्र करत होते.


"थांबवा बघू तुमचं ते संगीत," उंदीर म्हणाला.

"जास्तच करता आहात तुम्ही आता!"

“काय म्हणालास?” रातकिड्याने विचारलं.

"तुला अजून संगीत हवं आहे? मी अजून एका मित्राला घेऊन येतो."






लवकरच तिथे तीन रातकिडे किर्र किर्र करत होते.

"थांबवा तुमचं हे संगीत बिंगीत", उंदीर म्हणाला. "दमलो आहे मी.

खूप असह्य होतं आहे मला आता!"

“काय म्हणालास?" रातकिड्याने विचारलं.

"तुला अजून जास्त संगीत हवं आहे? आम्ही आणखी एका मित्राला घेऊन येतो."



"काय म्हणालास?" रातकिड्याने विचारलं.

"तुला अजून खूप संगीत हवं आहे?

आम्ही खूप मित्रांना गोळा करून आणतो."

लवकरच तिथे दहा रातकिडे किर्र किर्र करत होते.

"बास करा!" उंदीर ओरडला.

"तुमचं गाणं बजावणं फारच जोरात आहे!"

"जोरात?" रातकिड्यांनी विचारलं.


"हो, आम्ही अजून जोरात किर्र किर्र करू शकतो."



असं म्हणून रातकिडे जोरजोरात किर्र किर्र करू लागले.

"आम्ही दुसरीकडे कुठे जाऊन किर्र किर्र करतो,"
दहा रातकिडे म्हणाले.





"कृपा करा रे!" उंदीर ओरडला. "मला झोपायचं आहे. तुम्ही सगळे इथून निघून जा."

"निघून जाऊ?" रातकिड्यांनी विचारलं.

"आधीच का नाही सांगितलंस मग तसं?"

ते दुसरीकडे निघून गेले

आणि तिथे किर्र किर्र करू लागले.



आणि उंदीर पुन्हा झोपी गेला.



काटेरी झुडूप

एक म्हातारी बाई आपल्या घराच्या दाराकडे धावली.

रडत होती ती.

एक पोलिस पळत तिथे आला.

"आजीबाई," पोलिस म्हणाला, "का रडत आहात?"

"ये आत," म्हातारी म्हणाली.

"दाखवते तुला काय झालं ते."





"इथे कसं आलं हे?" पोलिसाने विचारलं.

"मला नाही माहीत," म्हातारी म्हणाली. “एक दिवस मी खुर्चीत बसले तेव्हा मला काहीतरी टोचलं. मी उठून पाहिलं.

हे काटेरी झुडूप तिथे होतं."

"बघ, माझ्या खुर्चीत काटेरी झुडूप उगवलं आहे," म्हातारी म्हणाली.



"बिचाऱ्या आजीबाई," पोलिस म्हणाला.

"थांबा मी तुम्हाला ते काटेरी झुडूप खुर्चीतून उपटून देतो.

मग तुम्हाला पुन्हा बसता येईल."

"नको नको!" म्हातारी ओरडली.

"तसं मुळीच नको करू!

मला बसायचं नाही आहे.

आयुष्यभर मी बसलेच आहे.

मला माझं काटेरी झुडूप खूप आवडतं.

त्याची तब्येत बरी नाही म्हणून मी रडत आहे.



"पाहिलंस?" म्हातारी म्हणाली.
"सगळ्या फांद्या कश्या मलूल होऊन पडल्या आहेत."

"तुमच्या काटेरी झुडपाला तहान लागली असेल," पोलिस म्हणाला.

"त्याला कदाचित पाणी हवं असेल."

"अरेच्चा मला हे सुचलंच नाही," म्हातारी म्हणाली.

तिने खुर्चीवर थोडं पाणी ओतलं.





काटेरी झुडूप थोडंसं थरथरलं. थोडंसं शहारलं.



फांद्यांना हिरवी पानं फुटली.



पानांजवळ छोट्या छोट्या कळ्या उगवल्या.



कळ्या उमलल्या.

त्यांचे मोठ्ठे गुलाब झाले.

"पोलिसदादा, तुझे आभारच मानले पाहिजेत!" म्हातारी आनंदाने म्हणाली.

"तू माझं काटेरी झुडूप वाचवलंस!

तुझ्यामुळे माझं घर सुंदर झालं!"

तिने पोलिसाचा मुका घेतला आणि त्याला गुलाबाचा एक मोठा गुच्छ घरी न्यायला दिला.





"घे," उंदीर म्हणाला.

"या माझ्याकडच्या कहाण्या मी तुला सांगितल्या.

आता तुझं माऊस-सूप एकदम झकास होईल."

"छान." वीझल म्हणाला, “पण या कहाण्या सूपमध्ये कश्या घालायच्या?”

"सोप्पं आहे," उंदीर म्हणाला.

"पटकन बाहेर जाऊन आण एक गांधीलमाश्यांचं घरटं,

थोडा चिखल,

दोन मोठे दगड,

दहा रातकिडे,

आणि एक काटेरी झुडूप.

हे सगळं घेऊन ये आणि सूपमध्ये घाल."



वीझल पळतच बाहेर गेला.

जाताना दार बंद करायला विसरला.

वीझलला सापडलं

एक गांधीलमाश्यांचं घरटं.

त्याला बऱ्याच गांधीलमाश्यांनी डंख मारले.





वीझलला सापडले दोन मोठे दगड.

ते अगदी जड होते.



वीझलला मिळाला थोडा चिखल.

तो ओला आणि चिकट होता.

वीझलला सापडले दहा रातकिडे.

त्यांना पकडायला त्याला उड्या
माराव्या लागल्या.





वीझलला सापडलं काटेरी झुडूप.

त्याला टोचलं आणि खरचटलं.



पण जेव्हा वीझल घरी पोचला, तेव्हा काय आश्चर्य!

सूपचं पातेलं तर रिकामंच होतं.

"आता माझं माऊस-सूप चवदार लागेल!" वीझल म्हणाला.







उंदीर पळतच आपल्या
सुरक्षित घरी गेला.

त्याने शेकोटी पेटवली.

तो जेवला.



आणि त्याने आपलं पुस्तक
वाचून संपवलं.